


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

**1,22,570**
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०२ ● अंक : ०२८ ● पुणे ● शुक्रवार, दि. ०६ डिसेंबर २०२४ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





# 'देवाभाऊ' : नगरसेवक ते मुख्यमंत्री!

एकदा नव्हे तर दोन वेळा हातातोंडाशी आलेल्या मुख्यमंत्रिपदाचा घास सोडायला लागला तर एखाद्या नेत्याची अवस्था काय होऊ शकेल? या गोष्टीचा फायदा घेऊन एक तर त्याला राजकारणातून संपवला जाईल किंवा त्याला कुठेतरी कोपऱ्यात फेकून दिलं जाईल. याच गोष्टी देवेंद्र फडणवीस यांच्या बाबतीतही करण्याचा अनेकदा प्रयत्न केला. पण जिद्द, संयम आणि राजकीय डावपेचाच्या जोरावर फडणवीस तरले आणि राजकारणाच्या सारीपाटावर पुन्हा झळाळून उठले. 'मी पुन्हा येईन' असं म्हणणारे देवेंद्र फडणवीस खरोखरच पुन्हा आले. आता ते महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री झालेत. 2019 साली पूर्ण बहुमत मिळालेलं असतानाही उद्धव ठाकरेंनी वेगळी भूमिका घेतली आणि फडणवीसांना विरोधी पक्षात बसावं लागलं. त्यावेळी विरोधी पक्षनेता म्हणून भाषण करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले होते की, 'मेरा पानी उतरता देख मेरे किनारे पर घर मत बसा लेना। मैं समंदर हूँ, लौटकर फिर आऊँगा'. आता तेच शब्द फडणवीसांनी खरे करून दाखवलेत. राजकारणात शेरोशायरी करणं फार सोपं असतं. पण, देवेंद्र फडणवीस होणं मुळीच सोपं नाही. 2014 ला ते मुख्यमंत्री झाले, तेव्हापासून 2024 पर्यंतचा त्यांचा राजकीय प्रवास हा प्रचंड संघर्षाचा राहिलाय. अनेकांनी त्यांना चक्रव्युहात अडकवण्याचा प्रयत्न केला. पण, महाराष्ट्रातील या अवलियाने भल्याभल्यांना गारद केले. आता ते राज्याचे मुख्यमंत्री म्हणून पुन्हा शपथ घेताहेत. त्यानिमित्तानं त्यांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावा...

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एकनिष्ठ स्वयंसेवक ते मुख्यमंत्री असा त्यांचा झंझावाती राजकीय प्रवास राहिलाय. संघाचे सदस्य, नगरसेवक, महापौर, आमदार, भाजप पक्षाचे प्रदेशाध्यक्ष ते मुख्यमंत्री असा त्यांचा कमी वयात मोठा राजकीय प्रवास आहे. देवेंद्र फडणवीस यांचा जन्म 22 जुलै 1970 रोजी नागपुरात झाला. सरस्वती विद्यालयातून शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर नागपूर विद्यापीठातून कायद्याची पदवी संपादित केली. त्यानंतर पुढे बर्लिन येथे व्यवसाय व्यवस्थापन आणि प्रकल्प व्यवस्थापन पद्धती आणि तंत्र पदविकेचं शिक्षण घेतलं. शिक्षण सुरू असतानाच 1989 साली नागपुरात वॉर्ड संयोजक म्हणून त्यांनी राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. तसंच त्यांच्याकडं 1990 मध्ये नागपूर पश्चिम विधानसभा क्षेत्रात कार्यकारिणी सदस्य म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली. भारतीय जनता युवा मोर्चा, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्याशीही ते संबंधित होते. रामजन्मभूमी आंदोलनात फडणवीसांचा सक्रिय सहभाग होता. त्यानंतर वयाच्या अवघ्या 22व्या वर्षी ते 1992 ते 1997 दरम्यान नागपूर महापालिकेत पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यानंतर 1997 ते 2001 दरम्यान सर्वात कमी वयाचे महापौर म्हणून त्यांनी काम केलं. उत्तम वक्तृत्त्वं, दांडगा अभ्यास आणि प्रचंड लोकसंग्रह या बळावर 1999 मध्ये ते पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर 2004, 2009, 2014, 2019 आणि आता 2024 मध्ये सलग सहाव्यांदा ते आमदार म्हणून विजयी झालेत. 2010 मध्ये भाजपच्या महाराष्ट्र प्रदेशचे सरचिटणीस, 2013 मध्ये भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष, 2014 ते 2019



दरम्यान मुख्यमंत्री, 2019 ते जून 2022 पर्यंत महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते आणि जून 2022 पासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अशी पदे त्यांनी भूषवली आहेत. यासोबतच फडणवीस हे 2014 ते 2019 दरम्यान सलग 5 वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे मुख्यमंत्री ठरले. त्यानंतर 2019 मध्ये शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांच्याकडून धोका मिळाल्यामुळं त्यांना दुसऱ्यांदा मिळालेली मुख्यमंत्रीपदाची संधी औटघटकेची ठरली. अवघ्या 3 दिवसात फडणवीस यांना राजीनामा द्यावा लागला. परंतु, कोरोना महामारीच्या काळात विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी बजावलेली भूमिका ऐतिहासीक ठरली. एकीकडं राज्यातील जनतेशी संपर्क कायम ठेऊन ग्रास रूटवर काम करीत असताना त्यांनी अडीच वर्षे सातत्यानं महाविकास आघाडीचे वाभाडे बाहेर काढले. विरोधी पक्षनेते असतानाही देवेंद्र फडणवीसांनी संयम सोडला नाही. जून 2022 साली झालेल्या राज्यसभा निवडणुकीत पहिल्या आणि दुसऱ्या पसंतीक्रमाचा असा काही प्लॅन केला की कुणाच्या ध्यानीमनी नसतानाही भाजपचे धनंजय महाडिक निवडून आले. त्यावेळी एकत्रित शिवसेनेच्या संजय पवारांचा पराभव झाला. संख्याबळ नसतानाही त्यांनी भाजपचा खासदार निवडून आणला. त्यावेळी खुद्द शरद पवारांनीही फडणवीसांचं कौतुक केलं होतं. देवेंद्र फडणवीसांनी अनेकांना आपलंसं केलं, अनेक लोकांशी जोडून घेतलं, असं पवार म्हणाले होते. त्याच रात्री शिवसेनेच्या एकनाथ शिंदे यांनी बंड केलं आणि सूरतमार्गे गुवाहाटीची वाट धरली. शिवसेनेत बंडखोरी झाल्यानंतर राज्यात सत्तांतर होऊन महायुतीचं सरकार अस्तित्वात आलं. एकनाथ शिंदे यांना आपल्यासोबत घेतल्यानंतर पूर्ण संख्याबळ असतानाही, संधी असतानाही देवेंद्र फडणवीसांची मुख्यमंत्रिपदाची संधी पुन्हा हुकली. त्यावेळी कमी आमदार असतानाही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रिपद मिळालं आणि देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्रिपद घ्यावं लागलं. अडीच वर्षांनंतर पुन्हा एकदा संधी असतानाही मुख्यमंत्रिपद हातून निसटलं. ही देवेंद्र फडणवीसांच्या संयमाची पुन्हा एकदा परीक्षा होती. या सरकारमध्ये शिंदेंकडे मुख्यमंत्री पदाची धुरा सोपवून फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून काम करणं पसंत केलं. त्यानंतर अजित पवार आणि त्यांच्या समर्थक आमदारांचा राष्ट्रवादीचा मोठा गट सत्तेत सहभागी करून घेतला. यामुळेच महाराष्ट्राच्या राजकारणातील 'चाणक्य' म्हणून त्यांना ओळखले जाऊ लागले. याच काळात लाडकी बहिण योजना आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्कातील सातत्य या बळावर फडणवीस यांच्या नेतृत्त्वात 20 नोव्हेंबर 2024 रोजी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीनं 288 पैकी 236 जागांवर विजय मिळवला. राज्यात 2019 मधील निवडणुकीच्या प्रचारात "मी पुन्हा येईल" या फडणवीसांच्या वाक्याची विरोधकांनी प्रचंड टवाळी केली. परंतु, फडणवीसांनी टीकाकारांच्या तोंडी न लागता आपल्या कामावर फोकस करत सत्तेत कमबॅक केलंय. भाजपनं त्यांच्या इतिहासातल्या सर्वाधिक जागा तर जिंकल्याच, पण महायुतीतील इतर पक्षांचे आमदारही निवडून आणले. 'मी पुन्हा येईन' म्हणणारे देवेंद्र फडणवीस आता पुन्हा आलेत आणि तेही एकहाती बहुमत घेऊन. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाल्यानंतर आता त्यांचे हेच एकहाती नेतृत्व पुन्हा एकदा दिसणार आहे. त्यांना पुढील वाटचालीसाठी खूप साऱ्या शुभेच्छा!

## महिलांच्या स्वयंरोजगारासाठी "स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशन" पुन्हा कार्यरत : भूपेंद्र मोरे

### भविष्यात महिला भगिनींना चांगल्या संधी मिळणार : मोरे





**पुणे (दै. आरंभ पर्व)**
शिवराज्य समूहातर्फे नऱ्हे भागातील बचत गटातील महिलांसाठी व घरगुती काम करणाऱ्या महिलांसाठी स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशन संस्था पुन्हा कार्यरत झाली आहे.. अशी माहिती संस्थापक अध्यक्ष भूपेंद्र मोरे यांनी दिली आहे. आज नऱ्हे येथील भूपेंद्र मोरे यांच्या संपर्क कार्यालयामध्ये कष्टकरी, गृहिणी यांची महिलांची बैठक आयोजित करण्यात आली. त्यावेळी स्वयंरोजगारा संधी बाबत सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांनी बैठकीत मार्गदर्शन केले. यापूर्वी नऱ्हे व परिसरातील सर्व महिलांसाठी स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशनने भरीव कामगिरी केली होती .त्याच उद्देशाने महिलांसाठी याही पुढे आपण कार्यरत राहून महिलांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी आपण कार्यरत राहणार असल्याचे मोरे यांनी यावेळी सांगितले. पुढील काळामध्ये स्वयंरोजगाराच्या भरपूर संधी स्वप्नपूर्ती महिला फाउंडेशनच्या माध्यमातून देण्यात येणार आहेत.

त्यासाठी मी तुमच्यासोबत असेल असे आश्वासनही भूपेंद्र मोरे यांनी उपस्थित महिलांना दिले. यावेळी परिसरातील महिलांनी मोठी गर्दी केली होती.. भूपेंद्र मोरे यांनी महिलांच्या हक्कासाठी ,प्रश्नासाठी सातत्याने लढा दिला आहे. त्यामुळे ह्यावेळी आमच्यासाठी ते नक्की चांगले काम देतील असा ठाम विश्वास उपस्थित महिला भगिनींनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी सोनाली नायर, वैशाली पवार, रश्मी जगताप, नलिनी पवार, विजेता गायकवाड, मीना शिंदे, यांच्यासह मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.

## 'श्री गणेशा' चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
रोड ट्रीप म्हटली की, धमाल, मजा आणि मस्ती... वेळोवेळी सर्वांनीच अशा प्रकारची रोड ट्रीप अनुभवली असेल, पण आता हा आनंद मोठ्या पडद्यावर लुटण्याची संधी रसिकांना मिळणार आहे. 'श्री गणेशा' हा मराठीतील आगळावेगळा रोड मूव्ही प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज झाला आहे. 'श्री गणेशा' या आगामी मराठी चित्रपटाचा ट्रेलर रिलीज करण्यात आला आहे. हास्य-विनोद आणि गंमती-जंमतीची मेजवानी असलेल्या या मराठी फॅमिली एन्टरटेनर रोड मुव्हीची ट्रेलरमधील झलक उत्सुकता वाढवणारी आहे. हा चित्रपट 20 डिसेंबर रोजी सर्वत्र प्रदर्शित होणार आहे. 'श्री गणेशा' धमाल रोड ट्रीपचा आणि 'श्री गणेशा' फॅमिली एंटरटेनमेंटचा' असे म्हणत खऱ्या अर्थाने रोड ट्रीपच्या रोलर कोस्टर राईडवर नेणाऱ्या 'श्री गणेशा' या फॅमिली एंटरटेनमेंटची प्रस्तुती एमएच-12 सिने मीडियाने आऊट ऑफ द बॉक्स फिल्म्सच्या सहयोगाने केली आहे. संजय माणिक भोसले आणि कांचन संजय भोसले या चित्रपटाचे निर्माते असून, या चित्रपटाच्या निमित्ताने दिग्दर्शक मिलिंद कवडे पुन्हा एकदा लाफ्टर आणि मॅडनेसचा डबल धमाका करणार आहेत. रवि माणिक भोसले आणि महेश माणिक भोसले या चित्रपटाचे सहनिर्माते आहेत. ट्रेलरची सुरुवातच संजय नार्वेकरने साकारलेल्या भाई वेंगुर्लेकर या व्यक्तिरेखेपासून होते. संजयसोबत शशांक शेंडे आणि प्रथमेश परब हे मुख्य भूमिकेतील कलाकारही आहेत.




## ॲड. रमा सरोदे, विठ्ठल गायकवाड, मिलिंद अहिरे व प्रशांत धुमाळ यांना पुरस्कार जाहीर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
अखिल भारतीय काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खासदार सोनियाजी गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी यांच्या पुढाकारातून आयोजित सेवा-कर्तव्य-त्याग सप्ताहामध्ये मानवाधिकार कार्यकर्त्या ॲड. रमा सरोदे, आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते विठ्ठल गायकवाड, उद्योजक व आंबेडकरी कार्यकर्ते मिलिंद अहिरे व पुरोगामी विचारांना पुढे नेणारा कार्यकर्ता प्रशांत धुमाळ यांना 'संविधान रक्षक' पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. भारतीय संविधानाच्या 75 व्या वर्षानिमित्त, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 68 व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवार, दि. 6 डिसेंबर 2024 रोजी पत्रकार भवन येथे होणाऱ्या 'माझे जीवन, माझे संविधान' या कार्यक्रमावेळी हे पुरस्कार वितरित केले जाणार आहेत. या कार्यक्रमाला ज्येष्ठ संपादक व खासदार कुमार केतकर व ज्येष्ठ गांधी-आंबेडकर अभ्यासक अरूण खोरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, तर अध्यक्षस्थानी मोहन जोशी असतील. यावेळी उपस्थित सर्वांकडून संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले जाणार आहे, अशी माहिती कार्यक्रमाचे समन्वयक प्रथमेश आबनावे यांनी दिली. प्रथमेश आबनावे म्हणाले, "संविधानावर विविध प्रकारे आघात होत असताना समाजातील अनेक सुजाण लोक संविधान रक्षणाचे काम करीत आहेत. मोहन जोशी यांच्या संकल्पनेतून अशा व्यक्तींना दरवर्षी सन्मानित केले जाते. ॲड. रमा सरोदे या कायदे अभ्यासक म्हणून संविधान रक्षणाचे, तसेच मानवाधिकार जपण्याचे काम करीत आहेत. आजवर त्यांनी मानवाधिकाराच्या अनेक प्रकरणामध्ये यशस्वी लढा दिलेला आहे.


ॲड. रमा सरोदे | विठ्ठल गायकवाड | मिलिंद अहिरे | प्रशांत धुमाळ

## थोडक्यात




### पुण्यातील अद्ययावत किचनचे भूमीपूजन

**पुणे (आरंभ पर्व) :** डॉएच बँक आणि अक्षय पात्र फाउंडेशनने पुण्यातील शिवाजीनगर येथे विद्यार्थ्यांना पोषक आहार पुरवित आरोग्य, शिक्षण व आर्थिक वाढीला हातभार लावण्यासाठी अद्ययावत किचनचे भूमीजन केले. या नाविन्यपूर्ण केंद्राच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम म्हणजे प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण (PM POSHAN) योजनेच्या माध्यमातून समाजाच्या वंचित गटातील मुलांच्या आयुष्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठीच्या या संस्थांच्या संयुक्त प्रयत्नांच्या वाटचालीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. अक्षय पात्र फाउंडेशन ही संस्था पीएम पोषण उपक्रमाच्या अंमलबजावणीतील भागीदार व एनजीओद्वारे चालविला जाणारा जगातील सर्वात मोठा शालेय भोजन उपक्रम आहे. 2026 च्या सुरुवातीस कार्यान्वित होणार असलेले हे बहुमजली किचन संपूर्ण पुण्यातील सरकारी आणि सरकारी अनुदानप्राप्त शाळांतील 25,000 विद्यार्थ्यांना दररोज गरम, पौष्टिक भोजन पुरविणार आहे. समाजाच्या दुर्लक्षित स्तरातील मुलांची शाळेतील उपस्थिती, त्यांची शैक्षणिक कामगिरी आणि एकूण आरोग्य व स्वास्थ्यामध्ये सुधारणा घडवून आणणे हे या उपक्रमाचे लक्ष्य आहे. या केंद्रामध्ये स्वच्छता आणि सुरक्षेचा उच्चतम दर्जा राखला जाईल व ते अक्षय पात्रचे पुण्यातील मध्यवर्ती किचन म्हणून कार्यरत राहील. पोषण व शिक्षणाच्या समस्येवर उपाय शोधण्यापलीकडे जात रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी व स्थानिक शेतीला पाठबळ पुरवित समाजाच्या आर्थिक विकासाला खतपाणी घालण्यासाठीही हा प्रकल्प सज्ज आहे. या कार्यक्रमा प्रसंगी डॉएच बँक ग्रुप, इंडियाचे सीईओ श्री. कौशिक शापारिया यांच्यासह अक्षय पात्र फाउंडेशनच्या पुण्याचे रिजनल प्रेसिडंट श्री. संपती दास, अक्षय पात्र फाउंडेशनचे सीईओ श्री. श्रीधर व्यंकट,श्री.प्रवीण एनआर (आयएफएस),श्री. पृथ्वीराज बीपी(आयएएस) व पुणे सरकारी विभागाचे तसेच अक्षय पात्र फाउंडेशन इतर वरीष्ठ प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते.

## आगामी सणउत्सव 'प्लॅटिनम इव्हारा'सह साजरे करण्यास सज्ज रहा

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
सणासुदीनिमित्त दिवसा आणि सायंकाळीही भरजरी कपडे परिधान करण्याची वर्षातील योग्य वेळ सध्या सुरू आहे. या काळातील अत्याधुनिकता आणि सुरेखपणा सर्वांनाच भुरळ घालतो. एखादी पार्टी समाप्त झाल्यानंतर अशा प्रत्येक लूकबद्दल चर्चा होते. आपली शैली उंचावत असताना, प्लॅटिनम ज्वेलरीच्या मौल्यवान समयानुकूलतेसह या आकर्षक पोशाखांना पूरक बनवा. 'प्लॅटिनम इव्हारा'च्या संग्रहामधील अनोखे प्लॅटिनम दागिने या हंगामात आकर्षक दिसण्यासाठी आदर्श ठरणार आहेत. ताऱ्यांपासून निर्मिती झालेले प्लॅटिनम मौल्यवान आणि दुर्मिळ आहे. हे प्लॅटिनम ग्रहावर केवळ मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहे. जेव्हा तुम्ही 'प्लॅटिनम इव्हारा'मधील मौल्यवान प्लॅटिनम कानातले घेता तेव्हा त्या पहिल्यांदा बोनस मिळाल्याप्रमाणे विशेष क्षणांचे आदर्श चिन्हक किंवा साक्षीदार होता. या दुर्मिळ धातूपासून बनवलेल्या दागिन्यांइतका आनंदाचा क्षण साजरे करण्याचा उत्तम मार्ग नाही. घनतेने इतर मौल्यवान धातूंहून अधिक मजबूत असलेले प्लॅटिनम मौल्यवान रत्नांना सर्वात सुरक्षित पकड देते, ज्या स्त्रियांना साजेशा अशा अद्वितीय आणि विस्मयकारक डिझाइन्स तयार करण्यासाठी गुंतागुंतीच्या पद्धतीने ठेवल्या आहेत. पूजेसाठी पारंपरिक सिल्कची साडी असो किंवा रात्री उशिरा पत्ते खेळासाठी सध्याचे 'इंडो-वेस्टर्न' फ्लेअर असो, त्यासाठी 'प्लॅटिनम इव्हारा'चे मनमोहक प्लॅटिनम नेकलेस, आकर्षक प्लॅटिनम ब्रेसलेट, कानातले आणि मोहक अंगठ्या आकर्षक आहेतच, पण तुम्हाला प्रतिमानांबद्दल आणखी काही विशेषणे जोडावी लागतील. आधुनिक छायाकृति, भूमिती, टेक्सचरीस आदींमुळे तुमच्या शैलीतील गुणांक सहजतेने वाढवतात. 95 टक्के शुद्धतेचे दुर्मिळ वचन देताना, अनन्य हिऱ्याच्या तुकड्यांसह एकत्रित केलेले किमान पण अखंड अनेक प्रकारचे मौल्यवान दागिने प्रत्येक पोशाख, विवेकी शैलीला पूरक बनवतात.



आघाडीच्या ज्वेलरी रिटेल स्टोअरमध्ये उपलब्ध असलेल्या नवीन 'प्लॅटिनम इव्हारा'च्या संग्रहामधून दागिन्यांची निवड करा. 'प्लॅटिनम इव्हारा'चे हे केवळ दागिने नसून, प्रत्येक युवतीच्या अनोख्या वाटेचे प्रतीक आहे. तसेच त्यांची वाढ आणि व्यक्तिमत्व परिभाषित करणारे टप्पे आहेत. अद्वितीय डिझाइन आणि प्लॅटिनमच्या दुर्मिळ गुणवत्तेमुळे महत्त्वपूर्ण क्षण आणि आयुष्यातील यशस्वी टप्पे साजरे करण्यास हे दागिने योग्य आहेत.

सणासुदीच्या हंगामात 'प्लॅटिनम इव्हारा'च्या या समकालीन डिझाईन्ससह अनोख्या शैलीत पाऊल टाका, जे तुमची छबी अधिक उंचावण्यास प्रोत्साहन देते.

प्लॅटिनम मोझॅक मेडली नेकलेस : बहुआयामी नमुन्यांसह त्रिकोणी पैलूंचे मोझॅक या प्लॅटिनम नेकलेसमध्ये मध्यभागी ठेवण्यात आले आहेत. त्याच्यातील वैविध्यपूर्ण वीण तुमच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू प्रतिध्वनित करतात, प्रत्येक वीण तुम्हाला आनंद देतात आणि तुम्हाला खरोखर अद्वितीय बनवतात. 95 टक्के शुद्ध प्लॅटिनममध्ये तयार केलेले नक्षीदार तसेच मौल्यवान दागिन्यांमधील शुद्धतेच्या सर्वोच्च मानकांपैकी एक असलेल्या 'पीटी950' चिन्हासह हा एक धातू आहे जो खरोखरच अनोखा आहे. ऑफिस पार्टीसाठी 'प्लॅटिनम मोझॅक मेडली नेकलेस' एक परिपूर्ण साथीदार असून, साध्या मानवी पोशाखाला आकर्षकतेचा स्पर्श जोडतो.

प्लॅटिनम प्रीशियस पेलेट्स ब्रेसलेट : या चमकदार प्लॅटिनम ब्रेसलेटमध्ये 'स्ट्राइकिंग पॅलेट सेंटरपीस'द्वारे नाजूकपणे गुंफलेल्या लिंक्स आहेत. हे एक सुंदर स्मरणपत्र असून, जे तुम्हाला 'अँकर' ठेवते आणि तुम्हाला नवी ओळख देते.

95 टक्के शुद्ध प्लॅटिनममध्ये तयार केलेला, नैसर्गिकरित्या पांढरा, ज्याचा रंग कधीही बदलत नाही, असा मौल्यवान धातू असून, जो खरोखरच अनोखा आहे, तो आपण किती अद्वितीय आहोत, हे प्रतिबिंबित करतो. तुमच्या हातात वाईनचा स्वादिष्ट ग्लास आहे किंवा तुमच्या हातात तीन पत्ते आहेत, अशावेळी आकर्षक प्लॅटिनम ब्रेसलेट सर्वांचे लक्ष वेधून घेईल, याची खात्री आहे.

## थोडक्यात



### बलिदान लोकांसमोर आणण्याची आवश्यकता : मंजिरी मराठे

**पुणे (आरंभ पर्व) :** देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात विविध घटकांचे महत्व आहे, स्वातंत्र्यसेनानींच्या लढ्यात, सामाजिक कार्यात त्यांच्या कुटुंबियांचंही मोठा वाटा राहिलेला आहे, विशेषता महिलांचा त्याग, बलिदान मोठे होते परंतु पुरुषांच्या शौर्यामध्ये, कर्तुत्वकथा मध्ये त्यांच्या घरातील महिलांचे कार्य झाकोळले गेले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा इतिहास सांगताना त्यांचा कुटुंबातील महिलांचा त्याग, बलिदान लोकांसमोर आणण्याची आवश्यकता असल्याचे मत स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबईच्या कोषाध्यक्ष मंजिरी मराठे यांनी व्यक्त केले. स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशन, पुणेच्या वतीने सेवा भवन, पटवर्धन बाग, एरंडवणा येथे आयोजित यमुनाबाई (माई) विनायक सावरकर यांच्या 136 व्या जयंती महोत्सव कार्यक्रमात मराठे बोलत होत्या. यावेळी बाल साहित्यिक डॉ. संगीता बर्वे, गीता धर्म मंडळाच्या कार्यवाह विनया मेहेंदळे, राष्ट्र सेविका समिति पुणे महानगर कार्यवाहीका ज्योती भिडे, फाउंडेशनचे अध्यक्ष प्रीतम थोरवे, विश्वस्त श्रीराम जोशी, प्राची देशपांडे, नयन ठाकूर आदि मान्यवर उपस्थित होते.



### 'ड्रॅगनच्या लोकशाहीची प्रेमकथा' कादंबरीचे प्रकाशन

**पुणे (आरंभ पर्व) :** चीनने 1950 साली तिबेटवर आक्रमण केले त्यावेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी चीन कडून धोका असल्याचे म्हंटले होते. मात्र पुढे पं. जवाहरलाल नेहरूंनी हिंदी - चीनी भाई भाई ची घोषणा दिली, पुढे 1962 साली आपल्याला किंमत चुकवावी लागली. अलीकडे गलवान मध्ये तसे करण्याचा प्रयत्न केले मात्र आजच्या भारताने आरे ला कारे उत्तर दिले. आजच्या परिस्थितीत चीनमध्ये लोकशाही अस्तित्वात आली तर भारताला आणि जगाला देखील फायदा होईल असे मत माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केले. चेतक बुक्सने प्रकाशित केलेल्या आणि पराग देव यांनी लिहिलेल्या 'ड्रॅगनच्या लोकशाहीची प्रेमकथा' या कादंबरीचे प्रकाशन करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून धर्माधिकारी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे होते. यावेळी लेखक पराग देव, अनय जोगळेर आदि मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना धर्माधिकारी म्हणाले, नेहरू यांच्या चुकीच्या धोरणामुळे चीन आपल्याला डोईजड झाला होता. आजही त्यांचे परिणाम आपल्याला दिसत असून आपल्या देशाला धोका असलेल्या देशांच्या यादीत आजही चीन नंबर एक वर आहे. यामुळे आपल्याला चीनचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे.

## सारोळे ग्रामपंचायतच्या

# उपसरपंचपदी जितेंद्र चौधरी यांची निवड

### बाळराजे गाटे यांचा मोठेपणा : संघर्षात साथ देणाऱ्या सहकाऱ्यास उपसरपंचपदाची संधी



**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील सारोळे ग्रामपंचायत उपसरपंच पदी जितेंद्र नवनाथ चौधरी यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

पॅनल प्रमुख असलेले विद्यमान उपसरपंच असलेले बाळराजे गाटे यांनी स्वइच्छेने राजीनामा दिल्याने उपसरपंच पद रिक्त झाले होते. मनाचा मोठेपणा दाखवत त्यांनी संघर्षात साथ देणाऱ्या सहकाऱ्यास उपसरपंचपदाची संधी दिल्याने सर्वत्र कौतुक व्यक्त होत आहे.

खुर्चीचा मोह भल्याभल्यांना सुटत नाही . ह्या निमित्त बाळराजे गाटेनी एक राजकारणात चांगला आदर्श घालून दिला आहे..

तत्कालीन उपसरपंच बाळराजे गाटे यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त उपसरपंचपदाची निवडणूक घेण्यात आली. सरपंच सुवर्णा काकडे यांच्या नेतृत्वाखाली सर्व सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली. त्यात उपसरपंच निवडीसाठी जितेंद्र चौधरी यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ग्रामसेवक संतोष आवारे यांनी काम पाहिले.

#### गावाच्या विकासाला प्राधान्य देणार : जितुभाऊ चौधरी

निवडीनंतर बोलताना उपसरपंच जितेंद्र चौधरी यांनी गावाच्या विकासाला प्राधान्य देणार असून आगामी काळात आणखी विकास कामे करण्यात येतील. एकता ग्रामविकास आघाडीने आजपर्यंत भरपूर विकासकामे केली. ती पुढे नेण्याचा माझा प्रयत्न असेल. पुनश्च उपसरपंचपदाची संधी दिल्याबद्दल नेते, सर्व कार्यकर्त्यांचा आभारी आहे. असे चौधरी यांनी यावेळी बोलताना सांगितले.

#### इतरांना संधी मिळावी हाच उद्देश : बाळराजे गाटे

मी मागील नऊ वर्षापासून ग्रामपंचायतचा कारभार पाहत आहे. सरपंच, उपसरपंच ह्या पदाच्या माध्यमातून गावाच्या विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. आमचे नेते माजी आमदार राजाभाऊ राऊत ही यांच्यामार्फत कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर झाली. व अनेक कामेही सुरू आहेत. जितुभाऊ चौधरी व इतर सर्व सदस्य गेली अनेक वर्षापासून मला चांगली साथ देत आहेत. त्यांनाही ग्रामपंचायत कारभार करण्याची आणखी संधी मिळावी यासाठी मी राजीनामा दिला आहे.मात्र याही पुढे आम्ही सर्वजण सारोळयाच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत..गावाचा सर्वांगीण विकास करणे हेच ध्येय आहे.

- बाळराजे गाटे, पॅनल प्रमुख/मा.उपसरपंच

यावेळी सरपंच सुवर्णा काकडे, उपसरपंच बाळराजे गाटे , जितेंद्र चौधरी, वैराग पोलीस स्टेशनचे माळी साहेब,पोलीस पाटील अण्णासाहेब साबळे, तंटामुक्ती अध्यक्ष अरुण पाटील,आगतराव भोसले, प्रकाशभैय्या गाटे, बालाजीभाऊ निचळ, कल्याण पाटील, कल्याण गाटे, अंकुश गाटे, ग्रामपंचायत सदस्य संदीप साबळे, मनीषा गाटे, रेखा साबळे, मथुरा गाटे, प्रेमला गाटे, व ग्रामपंचायत शिपाई विजय महापुरे ,लक्ष्मण ठोंबरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*देशाच्या बदलासाठी तुम्ही सहानुभूती आणि सर्जनशीलतेच्या माध्यमातून*

## महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकता : सुधा मुर्ती




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीने 6 व्या पदवीदान समारंभाचे आयोजन केले होते, ज्यात 293 विद्यार्थ्यांना डिझाईन, आर्किटेक्चर, मास्टर ऑफ डिझाईन आणि अनंत फेलोशिप इन सस्टेनेबिलिटी अँड बिल्ट एन्व्हायर्नमेंट या विविध अभ्यासक्रमांसाठीच्या पदव्या प्रदान करण्यात आल्या.

या समारंभात प्रमुख पाहुण्या म्हणून इन्फोसिस फाउंडेशनच्या संस्थापक, लेखिका, समाजसेविका, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कार प्राप्त सुधा मुर्ती या उपस्थित होत्या. त्यांच्यासोबत समारंभात अनंत नॅशनल युनिव्हर्सिटीचे अध्यक्ष अजय पिरामल, प्रॉवोस्ट डॉ. अनुनया चौबे, फाउंडिंग प्रॉवोस्ट डॉ. प्रमथ राज सिन्हा आणि इतर बोर्ड सदस्य देखील उपस्थित होते. पिरामल ग्रुपच्या उपाध्यक्ष स्वाती पिरामलही यावेळी उपस्थित होत्या.

सुधा मुर्ती यांचा समाजसेवा, आरोग्य, शिक्षण, महिलांच्या सक्षमीकरण आणि सार्वजनिक स्वच्छतेसाठीच्या कार्याबद्दल त्यांचा मोठा आदर केला जातो. इन्फोसिस फाऊंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा म्हणून मूर्ती यांनी अनंत नॅशनल युनिव्हर्सिटी चॅम्पियन्सचे तत्त्व, डिझाइन-चालित, समस्या-निवारणाचे सिद्धांत स्पष्ट केले.



## बसमध्ये जागतिक दिव्यांग दिन साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या स्वारगेट ते धायरी मारुती मंदिर या मार्गावर बसमध्ये काम करत असताना वाहक तानाजी कांबळे यांनी अंध व दिव्यांग प्रवाशांना खाऊ वाटून दिव्यांग दिन साजरा केला. नेहमीच वेगवेगळ्या प्रकारचे दिव्यांग प्रवासी प्रवास करत असतात ते वाहक चालक यांना भेटत असतात. त्यांची चढउतार करत असताना चालक वाहक अतिशय काळजीने प्रथम दर्शनी त्यांना प्राधान्य देत असतात .

आज जागतिक दिव्यांग दिनानिमित्त अपंग प्रवासी अंध प्रवासी राधा रा. धायरी व त्यांच्यासोबत असणाऱ्या आजी व इतर दिव्यांग या बस मध्ये प्रवास करत असताना वाहक तानाजी कांबळे व चालक खंडू जाधव यांनी दिव्यांग दिन खाऊ वाटप करून साजरा केला.

यावेळी दिव्यांग प्रवाशांना अंध प्रवाशांना खाऊ वाटप करण्यात आला व त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी वाहक तानाजी कांबळे म्हणाले दिव्यांग प्रवाशांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या मोफत पास योजनेचा लाभ सर्वांनी घ्यावा व इतर दिव्यांग विषयी शासनाच्या योजना ची माहिती माझ्याकडे उपलब्ध असून मी सध्या दिव्यांगांची पेन्शन वाढीसाठी महाराष्ट्र शासनाकडे पाठपुरावा करत आहे त्याची माहिती वेळोवेळी मी आपणास देईल असे ते म्हणाले.

इतर सहकारी प्रवासी मित्रांनी आपल्या भागातील अंध दिव्यांगांना याबाबत मदत करावी माहिती द्यावी. दीव्यांग प्रवाशांचं या अनोख्या पद्धतीने स्वागत केल्यामुळे इतर प्रवाशांनी त्यांच्या कौतुक केलं व अपंग प्रवाशांनीही आम्ही खरंच भारावून गेलो आहोत कारण असा अनुभव आम्ही प्रथमच घेत आहोत नेहमीच वाहक चालक यांची आम्हाला प्रवास करताना मदत होत असते त्यामुळेच आम्ही सुरक्षित प्रवास पीएमपी ने करतो अशी भावना बोलून दाखवली याबाबत त्यांनी कौतुकही केले.

वाहक तानाजी कांबळे हे नेहमीच दिव्यांग जेष्ठ नागरिक यांच्याबरोबर इतरही प्रवाशांची काळजीने चढउतार करत असतात व नेहमीच त्यांना मदत करत असतात..








# मिसेस महाराष्ट्र 2024 सीझन 8 : साहस, आत्मविश्वास आणि मुकुट

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
दीर्घ प्रतीक्षेनंतर आलेल्या मिसेस महाराष्ट्र 2024 स्पर्धेचा यशस्वी समारोप 1 डिसेंबर 2024 रोजी HYATT पुणे येथे झाला. या कार्यक्रमाचे आयोजन अंजना आणि कार्ल मस्करेनहास यांनी, DIVA Pageants या संस्थेचे संस्थापक म्हणून केले होते. या वर्षीची स्पर्धा ही बुद्धिमत्ता, सौंदर्य, आणि सामाजिक जागरूकता यांना अधोरेखित करणारी होती, ज्याने सौंदर्य स्पर्धेचा पारंपरिक दृष्टिकोन बदलला. या 8 व्या सलग वर्षीच्या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील 53 अंतिम स्पर्धकांनी भाग घेतला. या महिलांनी आपल्या अप्रतिम क्षमतांचे प्रदर्शन करत, वय, क्षेत्र किंवा पार्श्वभूमी यांच्यामुळे सौंदर्य, कौशल्य आणि कृपेच्या मर्यादा कधीही येत नाहीत हे दाखवून दिले. DIVA Pageants (www.divapageants.com) यांनी आयोजित केलेल्या या सीझनने महिलांच्या अमर्याद क्षमतेचा उत्सव साजरा केला. कार्यक्रमाला प्रसिद्ध ज्यूरींची उपस्थिती लाभली. यात सोनाली कुलकर्णी, ज्यांनी "दिल चाहता है", "सिंघम" यांसारख्या आयकॉनिक चित्रपटांमधून आपली छाप पाडली, तसेच अभिनेता विराट मडके यांचा समावेश होता. याशिवाय, अपेक्षा दबराल (DIVA क्वीन आणि Universal Woman India 2024 Social Project विजेत्या), कार्ल मस्करेनहास (DIVA Pageantsचे डायरेक्टर), फरहा अन्वर (मिसेस इंडिया 2016 आणि मिसेस एशिया 2018), मेघना देवान गोपाल (Woman of the Universe Indo Asia 2024), विद्या तिवारी (लोकप्रिय खाद्य समीक्षक आणि फॅशन स्टायलिस्ट), आणि शिखा सिंग (मिसेस महाराष्ट्र 2023 विजेत्या) हे ज्यूरी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैतन्य राठी यांनी केले, ज्यांनी प्रेक्षकांना संपूर्ण रात्र खिळवून ठेवले.

अंजना आणि कार्ल मस्करेनहास, सिसिलिया सन्याल, माधवी घोष, आणि अपेक्षा दबराल यांच्या नेतृत्वाखाली अंतिम स्पर्धकांना त्यांच्या उत्कृष्टतेची ओळख करून देण्यासाठी प्रशिक्षित करण्यात आले. स्पर्धेच्या चार दिवसांत, स्पर्धकांना पोझिंग, सादरीकरण, प्रश्नोत्तर, रॅम्प वॉक आणि इतर अनेक गोष्टींवर वैयक्तिक प्रशिक्षण देण्यात आले. पूजा सिंग यांनी कोरिओग्राफी केली, ज्यामुळे कार्यक्रम अधिक भव्य झाला. DIVA मार्गरिट शिबू यांना मिसेस मिलेनियम युनिव्हर्स इंडिया 2025, आणि DIVA राधिका भूषण यांना वुमन ऑफ द युनिव्हर्स इंडिया 2025 म्हणून गौरविण्यात आले. त्या आता आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करतील.

कार्यक्रमाचे यश हे मृणालिनी भारद्वाज, मृणाली तायडे, तनुजा बंगेरीया, सिसिलिया सन्याल, आणि स्पेंटा पटेल यांच्या समर्पित कार्यसंघामुळे शक्य झाले.

विजेते: मिसेस महाराष्ट्र 2024 सीझन 8
सिल्व्हर श्रेणी
विजेती: नंदिता चौहान
फर्स्ट रनर-अप: मेहर इक्बाल
सेकंड रनर-अप: प्रतीक्षा जगताप
थर्ड रनर-अप: मोनिका भोसले
गोल्ड श्रेणी
विजेती: डॉ. स्वेता कारलापुडी
फर्स्ट रनर-अप: डिंपल झवेरी
सेकंड रनर-अप: प्रियांका गोवर्धन
थर्ड रनर-अप: अमृता कौर
एलीट श्रेणी
विजेती: प्राजक्ता भोईर
फर्स्ट रनर-अप: अनुपमा सिंग
सेकंड रनर-अप: डॉ. मनीषा नाईक
थर्ड रनर-अप: प्रमिता शेट्टी
अधिकृत भागीदार
Powered By: HYATT पुणे
मीडिया भागीदार: लोकमत
मासिक भागीदार: गृहलक्ष्मी
वेलनेस भागीदार: O Esthetics पुणे
ट्रॅडिशनल राउंड भागीदार: प्रणाली रेंटल स्टुडिओ
मेकअप आर्टिस्ट आणि नेल भागीदार: कोको नेल्स पुणे
ज्वेलरी भागीदार: WeBe Events and Production
मेकओव्हर भागीदार: सुनयना कांबळे
चॅरिटी भागीदार: We Help Welfare Foundation
कास्टिंग भागीदार: Diva Talent Hub
सौंदर्य भागीदार: 7th Heaven Salons
गिफ्टिंग भागीदार: कोठारीज
रॉयल ऑर्गॅनिक फूड्स, सबलान फूड्स, हेजल कॉस्मेटिक्स, रिदान अरे, मोडासूत्र, प्रोटिओस
PR भागीदार: Inspirations
पेजंट मीडिया भागीदार: Pageant & Influence
सोशल मीडिया भागीदार: Purple Shine
व्हिडिओग्राफी भागीदार: I Plus Media Solutions
फोटोशूट भागीदार: Desi Artists India
आयवेअर भागीदार: Lawrence & Mayo
इव्हेंट व्यवस्थापन: Kubber Events
पेजंट भागीदार: मिसेस केरळ, मिसेस मध्य प्रदेश & मिसेस सेंट्रल इंडिया
छायाचित्रांचे वर्णन:
मिसेस महाराष्ट्र 2024 सीझन 8, जो DIVA Pageants द्वारा आयोजित केला गेला, 1 डिसेंबरला HYATT पुणे येथे झाला. या छायाचित्रात सिल्व्हर, गोल्ड आणि एलीट श्रेणीतील विजेते आणि रनर-अप यांना अभिनेत्री सोनाली कुलकर्णी आणि DIVA Pageantsचे संस्थापक कार्ल आणि अंजना मस्करेनहास यांच्यासोबत पाहिले जाऊ शकते. मान्यवर ज्यूरी सदस्य – मेघना देवान गोपाल, सोनाली कुलकर्णी, आणि कार्ल मस्करेनहास.

## थोडक्यात

### नववर्षारंभात धमाल 'मु. पो. बोंबीलवाडी' खळखळून हसवणार



**पुणे (आरंभ पर्व) :** विवेक फिल्म्स, मयसभा करमणूक मंडळीकृत परेश मोकाशी लिखित-दिग्दर्शित आणि मधुगंधा कुलकर्णी व दिलीप शितोळे निर्मित 'मु. पो. बोंबीलवाडी' नव्या वर्षात धमाल करणार आहे. या चित्रपटाचा टीझर नुकताच आला असून, 1 जानेवारी 2025 रोजी हा चित्रपट प्रदर्शित होत आहे. नवीन वर्षाची सुरुवात धमाल विनोदाने होणार आहे, याची खुणगाठ या टीझरमुळे पक्की होते. पुण्यातील पत्रकार भवनात सोमवारी चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक आणि कलाकारांनी चित्रपटाविषयी संवाद साधत मनमुराद गप्पा मारल्या. यावेळी प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले, वैभव मांगले, आनंद इंगळे, सुनील अभ्यंकर, अद्वैत दादरकर, मनमित पेम, अभिनेत्री रितिका श्रोत्री आदी उपस्थित होते. हरीश्चंद्राची फॅक्टरी, एलिझाबेथ एकादशी, वाळवी या तीन मराठी चित्रपटांना मिळालेल्या राष्ट्रीय पुरस्कारांच्या हॅटट्रिकनंतर येणारा लेखक-दिग्दर्शक परेश मोकाशी आणि निर्माती मधुगंधा कुलकर्णी यांचा हा चित्रपट आहे. मोकाशी यांची विनोदाची पठडी आणि त्यांच्या 'मु. पो. बोंबीलवाडी' नावाच्याच नाटकावर बेतलेल्या या चित्रपटाकडून रसिकांच्या आशा खूप उंचावल्या आहेत. त्यातच चित्रपटात तगडी स्टारकास्ट असल्यानेही प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहचली आहे.

# एचडीएफसी बँके तर्फे रक्तदान मोहिमेचे 6 डिसेंबर 2024 रोजी आयोजन



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
एचडीएफसी बँक या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँके तर्फे त्यांच्या राष्ट्रीय स्तरावरील रक्तदान मोहिमेचे आयोजन करण्यात येणार असून हे या उपक्रमाचे 16 वर्ष आहे. या उपक्रमाचे आयोजन बँकेचा महत्त्वपूर्ण सीएसआर उपक्रम असलेल्या परिवर्तन अंतर्गत दिनांक 6 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 9.30 ते संध्याकाळी 5.30 पर्यंत संपूर्ण भारतातील 1100 हून अधिक शहरात करण्यात येणार आहे.

यावर्षी एचडीएफसी बँकेला गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक चांगला प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा असून या उपक्रमातून अंदाजे 6 लाखांहून अधिक रक्ताच्या बाटल्या जमा होण्याची अपेक्षा आहे. या मध्ये सहभागी होणाऱ्या लोकांमध्ये एचडीएफसी बँकेचे कर्मचारी, ग्राहक, कॉर्पोरेट्स, संरक्षण विभागाचे सदस्य, विद्यार्थी आणि समाजातील विविध सदस्यांचा समावेश असेल. या उपक्रमाच्या माध्यमातून बँके कडून सामाजिक कल्याणाबरोबरच भारतातील रक्ताच्या पुरवठ्याच्या आव्हानाचा मुकाबला करण्यावर जोर दिला जाणार आहे. " एचडीएफसी बँकेमध्ये समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून बदलाची उर्जा घडवण्यावर आम्ही लक्ष केंद्रित करत असतो. आमच्या 16व्या संपूर्ण भारतीय स्तरावरील रक्तदान मोहिमेच्या माध्यमातून आम्ही नागरिकांना एक मंच उपलब्ध करून देत असून त्याच बरोबर समाजात चांगले योगदान देण्यास प्रवृत्त करत आहोत. जमा झालेल्या रक्ताचा प्रत्येक थेंब हा जीव वाचवता आणि आम्ही देण्याची संस्कृती जोपासण्याची आमची जबाबदारी पार पाडत आहोत." असे एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर श्री कैझाद भरूचा यांनी सांगितले. " रक्तदान हे केवळ औद्यार्याचे प्रतीक नाही तर ती गरजवंतांसाठी जीवनरेखा आहे. एचडीएफसी बँकेमध्ये आमचे कर्मचारी दरवर्षी एकत्र येतात आणि वार्षिक रक्तदान मोहिमेचे आयोजन करत आहेत, आता ही वाढ गेल्या 16 वर्षांपासून होत आहे. त्यांचे समर्पण हे एक सक्षम आणि आरोग्यपूर्ण समुदायाच्या निर्मितीचे द्योतक आहे. प्रत्येक थेंब महत्त्वाचा असून यामुळे आपण जीव वाचवू शकतो." असे एचडीएफसी बँकेचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर श्री भावेश झवेरी यांनी सांगितले.

ही मोहिम यशस्वी करण्यासाठी दरवर्षी एचडीएफसी बँकेतर्फे विविध प्रतिथयश अशा रक्तपेढ्या आणि आरोग्यसेवा प्रदाता संस्थांबरोबर भागीदारी केली जाते. या वर्षी पुन्हा एकदा प्रतिथयश रक्तपेढ्यांसह विविध सरकारी संस्था आणि विविध सामाजिक संस्थांबरोबर भागीदारी करून संपूर्ण देशभरात आपली शृंखला निर्माण केली आहे.

या मोहिमेत सुदृढ आरोग्य असलेली 18 ते 60 वर्ष वयोगटातील कोणतीही व्यक्ती सहभागी होऊ शकते. ज्यांना रक्तदान करायचे आहे अशा इच्छुकांनी जवळच्या शिबीराला भेट देऊन रक्तदान करावे. स्थळांची संपूर्ण सूची ही एचडीएफसी बँकेच्या वेबसाईट वर आणि अन्य डिजिटल मंचांवर उपलब्ध आहे.

2007 मध्ये सुरुवात केल्यापासून या रक्तदान मोहिमेने मोठी वाढ नोंदवली असून सुरुवातीला 88 केंद्रांमधून 4,385 पिशव्या जमा झाल्या होत्या. 2023 मध्ये ही संख्या वाढून 7,487 शिबीरांमधून अंदाजे 6 लाख पिशव्या रक्त जमा झाले होते. गेल्या वर्षी 1900 हून अधिक कॉलेजेस, 700 कॉर्पोरेट्स आणि 100 हून अधिक संरक्षण आणि सेवा क्षेत्रातील लोकांनी भाग घेतला होता.

गेल्या काही वर्षांत संपूर्ण भारतातून या उपक्रमाला मिळणारा प्रतिसाद आणि लोकांचा सहभाग पाहता या उपक्रमाचा परिणाम अधोरेखित होतो. एचडीएफसी बँक परिवर्तन वार्षिक रक्तदान मोहिमे कडून 2024 मध्ये 'सर्वात मोठी रक्तदान मोहिम (एकाच दिवशी, विविध ठिकाणी) आयोजित करण्याचा गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्स स्थापित केला आहे.

## कसे सहभागी व्हावे

नोंदणी करण्यासाठी किंवा रक्तदान करण्यासाठी दाते हे ६ डिसेंबर २०२४ रोजी जवळच्या रक्तदान शिबीराच्या स्थळी पोहोचू शकतात. त्यानंतर अतिशय सोपी अशी नोंदणी प्रक्रिया करुन सर्व दात्यांच्या आरोग्याची आणि सुरक्षेची काळजी घेतली जाईल. शिबीराचे स्थळ, नोंदणी आणि अधिक माहितीसाठी (https://leads.hdfcbank.com/applications/webforms/apply/Blood_Donation_Campaign/index.aspx) येथे तसेच एचडीएफसी बँकेच्या विविध समाजमाध्यमांच्या चॅनल्सना भेट द्या

# आरएसबी ग्रुपने साजरा केला 50 वर्षांचा यशस्वी ऑटोमोटिव्ह प्रवास



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतातील सर्वात मोठ्या ऑटोमोटिव्ह घटक निर्माता कंपन्यांपैकी एक आरएसबी ग्रुपने 50 वा वर्धापन दिन साजरा केला. नवकल्पना, धैर्य आणि वाढीच्या या पाच दशकांत समुहाने आपले स्थान निर्माण केले आहे. 1974 मध्ये श्री. आर.के. बेहेरा आणि श्री. एस.के. बेहेरा यांनी अवघ्या 2 लाख गुंतवणुकीसह 20,000 सरकारी अनुदानावर कंपनीची स्थापना केली होती. आज आरएसबी समुह 3,000 कोटींच्या उलाढालीत रूपांतरित झाले आहे. 1975 मध्ये 15 सदस्यांच्या टीमपासून सुरू झालेल्या आरएसबी ग्रुपमध्ये आज 6,000 हून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत.

कंपनीच्या वाढीच्या धोरणाचा भाग म्हणून, आरएसबी कंपनीने आगामी 3 ते 4 वर्षांत 10,000 कोटींचे महसूल गाठण्याचे उद्दिष्ठ ठरवत आयपीओ (इनीशियल पब्लिक ऑफरिंग) सुरू करण्याचे निश्चित केले आहे. समुहाने काही महिन्यांपूर्वी धोरणात्मक निर्णय घेत बैन कॅपिटलसोबत भागीदारी केली होती. या सहकार्यामुळे जैविक आणि अजैविक वाढीला चालना मिळणार असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विशेषतः मेक्सिकोत ऑपरेशन्सचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित केले जाणार आहे.

विघटनात्मक युगात वाढीच्या नवीन टप्प्याचा विचार करताना, आरएसबी अजैविक वाढीच्या संधी देखील शोधत आहे. "आम्ही शक्यतेच्या अशा संधींवर विचार करत आहोत, ज्यामुळे बदलत्या गरजांनुसार त्वरीत निर्णय घेतला येतील," असेही श्री. एस.के. बेहेरा यांनी सांगितले. आगामी पिढ्यांसमोर मजबूत वारसा निर्माण करण्यासाठी आरएसबी समुह मजबूत पायाभरणी करण्यास कटिबद्ध आहे. ७०-८० कोटींच्या इन-हाऊस डिझाईन, चाचणी आणि प्रमाणीकरण सुविधेतील गुंतवणुकीसह, संरक्षण, रेल्वे आणि दूरसंचार सारख्या उच्च क्षमतांच्या क्षेत्रांमध्ये विस्तार करण्याची समुहाची आकांक्षा आहे. नवीन वाढीसह या प्रभाव टप्प्यावर पोहोचण्यासाठी आरएसबी समुह तयारीत आहे. चिरस्थायी विकास आणि अत्याधुनिक इंजिनिअरिंगवर निरंतर लक्ष केंद्रित करून आरएसबी समुह ऑटोमोटिव्ह उद्योगात मानक सेट करत राहील आणि महत्त्वपूर्ण बदल घडवून आणेल.

सध्या आरएसबी भारतातील 17 उत्पादन सुविधा, दोन आंतरराष्ट्रीय प्लांट्स आणि पुण्यातील आय-डिजाईन इंजिनिअरिंग सोल्युशन्स लि. ही टेक्नोलॉजी कंपनी चालवते. ही कंपनी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय ग्राहकांना सेवा पुरवते. ज्यात टाटा मोटर्स, अशोक लीलँड, महिंद्रा & महिंद्रा, जॉन डिअर, व्होल्वो, रेनॉ, निसान, जेसिबी, फोर्ड, फियाट, इसुझू, कुमिन्स सारख्या कंपन्यांचा समावेश आहे.

ऑटोमोटिव्ह क्षेत्रात कार्यरत आरएसबी हा प्रॉपेलर शाफ्ट आणि ॲक्सलचा प्रमुख जागतिक निर्माता समुह आहे. यात फ्रंट ॲक्सल, ट्रेलर ॲक्सल, ट्रॅक्टर ॲक्सल, डमी ॲक्सल आणि ॲक्सल बीम्सचा समावेश आहे. सोबतच समुह लहान व्यावसायिक वाहनांसाठी गिअरबॉक्स आणि पूर्णपणे निर्मित गिअर्स, शाफ्ट्स, हब्स आणि स्लीव्हसही बनवितो. कास्टिंग आणि फोर्जिंगसाठी ही उत्पादने बॅकवर्ड इंटिग्रेशन सारख्या आवश्यक घटकांच्या गुणवत्ता नियंत्रणाची खात्री देतो. सीएमआय (कन्स्ट्रक्शन आणि माइनिंग इन्फ्रास्ट्रक्चर) विभागात आरएसबी हा अवजड फॅब्रिकेशन्स आणि ॲग्रिगेट्सचे प्रमुख निर्माता आहे. ज्यात एक्वेटर्स, बॅकहो लोडर्स आणि फ्रंट-एंड लोडर्ससाठी फ्रेम्स, आर्म्स, बूम्स आणि बकेट्सचा समावेश आहे.

आरएसबीच्या 50 वर्षांच्या प्रवासावर प्रकाश टाकताना, समुहाचे अध्यक्ष श्री. आर.के. बेहेरा म्हणाले, "हा 50 वर्षांच्या प्रवसात अनेकांचे योगदान लाभले आहे. जो उत्सव आज केवळ मैलाचा दगड ओलांडण्यापुरता मर्यादित नाही तर एका साध्या सुरुवातीतून, एकत्रित धडपड आणि सामायिक मूल्यांवर आधारित काम करणाऱ्यांचे जीवन आहे. हा प्रवास मी एकटा केला नाही. बंधू एस. के. बेहेरा यांचे सहकार्य, खंबीर पाठिंबा आणि निर्धारामुळे आम्ही सर्वात कठीण काळांमध्ये देखील टिकून राहू राहिलो. सुरुवातीला, आम्ही खूप अडचणींना सामोरे गेलो. मर्यादित संसाधने, आर्थिक अडचणी आणि सततच्या अडथळ्यांना तोंड दिले. पण एस. के . खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहिले.

आमच्या सोबत काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या अविरत धडपडीने आम्ही संकटांवर मात करू शकलो. त्यामुळे हे यश खरोखरच आरएसबी कुटुंबाच्या बलिदान, संघर्ष आणि समर्पणाचे प्रतीक आहे. पुढच्या पिढीला एकच गोष्ट सांगू इच्छितो, ती म्हणजे सत्यनिष्ठा, गुणवत्ता आणि आदर या मूल्यांचा दृढ आधार घ्या.

केवळ वाढीवरच नाही तर चिरस्थायीविकासावर देखील लक्ष ठेवायला हवे. सर्वांच्या या एकत्रित प्रयत्नांमधून आपण केवळ वाढच करू शकलेलो नाहीत, तर समुदाय आणि उद्योगावर प्रभाव टाकणारा आदर्श असा भक्कम वारसा असलेला समुह निर्माण करू शकलो आहोत.

आरएसबी समुहाचे उपाध्यक्ष श्री. एस.के. बेहेरा, म्हणाले, "एक लहान वर्कशॉपपासून आज 3,000 कोटींचे महसूल असलेला समुह बनण्यापर्यंतचा प्रवास हा संघर्ष, धोरणात्मक दृष्टिकोन आणि गुणवत्तेवर आधारित आहे. सोबत जुळल्या गेलेल्यांची काळजी घेतल्यास आपण असामान्य गोष्टी साधू शकतो, हा विश्वास सुरुवातीच्या दिवसांपासूनच कायम होता. समुहान गाठलेल्या या यशाच्या प्रवासात कर्मचाऱ्यांची मेहनत, कौशल्य आणि बलिदानाचे प्रतिबिंब आहे. ज्यांच्या समर्पणामुळे आरएसबी पुढे जात आहे. आता आम्ही नवीन संधी स्वीकारत आहोत. इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञानापासून ते आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये विस्तारापर्यंत आपला लक्ष कायम आहे. यात गुणवत्ता आणि सत्यनिष्ठेवर कोणतीही तडजोड नाही. भविष्यात, आपण वाढीचे नवीन मानक सेट करत राहू. हा निर्धार केवळ विस्तारापुरता मर्यादित नाही तर बाजारपेठेत दीर्घकालिक मूल्य आणि प्रभाव निर्माण करण्यासाठी देखील आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com
• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.